N.A

मुख्य कार्यालय : २१७२५
मुख्याधिकारी कार्यालय : २१०२५
मुख्य लिपीक : २१०८२
मुख्याधिकारी लिपीक : २१११८
कार्यालय लिपीक : २१७२६
पाणी पुरवठा विभाग : २१०५९

नगर परिषद, नांदुरा

जिल्हा - बुलडाणा (महाराष्ट्र) ४४३ ४०४

जावक क्र.....८५४/९८... दिनांक...2.९.१.२/८...

सहपत्र :- शासन निर्णय म.व व.वि. क्रमांक-एनए० १०९९/प्र.क्र.३२(तान)/ल-२, दिनांक- २७/९/१९९९.

नंदर
१२०३ ते १२०९
२००९

परिशिष्ट - पाच

महानगरपालिका/नगरपालिकांनी अकृषिक परवानगी / देताना निर्गमित करावयाच्या आदेशाचा नमुना /

महानगरपालिका/नगरपालिका यांचे कार्यालय.
क्रमांक- अकृषक प्र.क्र. १९८/...
दिनांक - २१/२/२००७

दस्त क्र. ५१८
२००८
दि. १०/२५

THE SEAL OF THE SUB REGISTRAR OF-1 NANDURA

वाचले :-

१) आदेश क्र. १८/९८ दि. ६/११/९८
२) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये [illegible]
३) कार्यालय टिपणी क्र. चौ. [illegible] दि. २३/८/९८
४) [illegible]

आदेश :-

ज्याअर्थी श्री. [illegible] रा. [illegible] ता. [illegible] जि. बुलडाणा यांनी बुलडाणा जिल्हयातील [illegible] तालुक्यातील मौजे अमडापुर या ठिकाणी स.नं. ८४९/१ मधील आपल्या मालकीच्या जमिनीतील २५.९३५:०० चौ.मी. एवढया जागेचा रहिवास/~~व्यापिज्य/औद्योगिक~~ या बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्याची परवानगी मिळण्याबाबत अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये सक्षम अधिकारी [illegible] यांच्याकडे निहीत करण्यात आलेलया अधिकारांचा वापर करुन उक्त सक्षम प्राधिकारी याद्वारे [illegible] यांना तालुका [illegible] मधील मौजे अमडापुर येथील स.नं. ८४९/१ मधील २५.९३५:०० चौ.मी. एवढया जमिनीच्या क्षेत्राची रहिवास /~~व्यापिज्य/औद्योगिक~~ या बिगर शेतकी प्रयोजनार्थ वापर करण्याबाबत पुढील शर्तीवर अनुज्ञा (परवानगी) देत आहेत.

१) ही परवानगी महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ व त्याखाली केलेले नियम यांच्या अधिन ठेवून देण्यात आलेली आहे.

२) अनुज्ञाग्राही व्यक्तीने (धारकाने) अशा जमिनीचा वापर व त्यावरील इमारतीच्या अ किंवा अन्य बांधकामाचा उपयोग, ज्या प्रयोजनार्थ करण्यात आला [illegible]

THE SEAL OF THE SUB REGISTRAR OF-1 NANDURA

३) अशी परवानगी देणा-या प्राधिका-याकडून [illegible] भूखंडाची किंमत त्याचे ते क्षेत्र उपखंड करण्याबाबत मंजूरी मिळाली असेल त्या उपभूखंडाची आणखी पोट विभागणी करता कामा नये.

४) अनुज्ञाग्राह व्यक्तीने (अ) महानगरपालिका/नगरपालिका यांचे समाधान होईल अशा रितीने अशा जमिनीत रस्ते, गटारे वगैरे बांधून आणि (ब) भूमापन विभागाकडून अशा भूखंडाची मोजणी व त्याचे सिमांकन करुन त्याने जमीन या आदेशाच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत मंजूर आराखडयाप्रमाणेच काटेकोरपणे विकसित केली पाहिजे आणि अशा रितीने ती जमीन विकसित केली जाईपर्यंत त्या जमिनीची कोणत्याही रितीने विल्हेवाट लावता कामा नये.

५) अनुज्ञाग्राही व्यक्तीस अशा भूखंड विकायचा असेल किंवा त्याची इतर प्रकारे विल्हेवाट लावायची असेल तर अशा अनुज्ञाग्राही व्यक्तीने तो भुखंड या आदेशात आणि सनदीमध्ये नमूद केलेल्या शर्तीचे पालन करुनच विकणे किंवा अशा शर्तीनुसारच त्याची अन्य प्रकारे विल्हेवाट लावणे आणि त्याने निष्पादित केलेल्या विलेखात तसा खास उल्लेख करणे हे त्याच कर्तव्य असेल.या सोबत जोडलेल्या स्थळ आराखडयात आणि किंवा इमारतीच्या नकाशात निर्दिष्ट केल्याप्रमाणे इतक्या जोते क्षेत्रावर बांधकाम करण्याविषयी ही परवानगी देण्यात आलेली आहे. सदर भूखंडातील नकाशात दर्शविल्याप्रमाणेच उर्वरित क्षेत्र विना बांधकाम मोकळे सोडले पाहिजे.

६) प्रस्तावित बांधकाम हे नकाशात दर्शविलेल्या मजल्यापेक्षा जास्त मजल्याचे असू नये.

७) प्रस्तावित इमारत किंवा कोणतेही काम (असल्यास) यांच्या बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी अनुज्ञाग्राही व्यक्तीने महानगरपालिका/नगरपालिका यांची असे बांधकाम करण्याविषयीची आवश्यक ती परवानगी मिळविणे हे अशा व्यक्तीवर बंधनकारक असेल.

८) अनुज्ञाग्राही व्यक्तीने सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे सिमांतक मोकळे अंतर (ओवर मार्जिनल डिस्टंरोस) सोडले पाहिजे..

९) या आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत अनुज्ञाग्राही व्यक्तीने अशा जमिनीचा बिगरशेती प्रयोजनासाठी वापर करण्यास सुरुवात केली पाहिजे. मात्र वळोवेळी असा कालावधी वाढविण्यात आला असेल तर अशा वाढ दिलेल्या कालावधीत वापरास सुरुवात केली पाहिजे. अनुज्ञाग्राही व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे वापरास सुरुवात न केल्यास ही परवानगी रद्द करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल.

१०) अनुज्ञाग्राही व्यक्तीने अशा जमिनीचे बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्यास ज्या दिनांकास सुरुवात केली असेल आणि किंवा ज्या दिनांकास त्याने अशा जमिनीच्या वापरात बदल केला असेल तर तो दिनांक त्यांने एक महिन्याच्या आत तलाठयास आणि महानगरपालिकेस कळविला पाहिजे. जर तो तसे करण्यास चुकेल तर महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व बिगरशेतकी आकारणी) नियम १९६९ मधील नियम ६ अन्वये त्याच्यावर कार्यवाही करण्यास असा अनुज्ञाग्राही पात्र ठरेल.

११) अशा जमिनीचा त्या प्रयोजनार्थ वापर करण्यास अनुज्ञाग्राहीस परवानगी देण्यात आली असेल त्या प्रयोजनार्थ वापर करण्यास प्रारंभ करण्याच्या दिनांकापासून सदर अनुज्ञाग्राहीने त्या जमिनीच्या संबंधात दर चौ.मी. मागे --०.९.०३३.-- रुपये दराने बिगरशेतकी आकारणी दिली पाहिजे. अशा जमिनीच्या वापरात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात आला तर त्या प्रसंगी निराळया दराने बिगरशेतकी आकारणी करण्यात येईलआणि अशावेळी हमीची मुदत अजून समाप्त व्हावयाची आहे ही गोष्ट विचारात घेण्यात येणार नाही.

१२) दिनांक --२३-१२-२००-- रोजी अस्तित्वात असलेल्या दराने अकृषिक आकारणी सदर आदेशामध्ये करण्यात आलेली असली तरी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,

नादर
२००२ ७-१७
२००२

THE SEAL THE SUB REGISTRAR G.T. NANDURA

न २ २
दस्त क्र. ५१८
२०२२
पृष्ठ १११२५

THE SUB REGISTRAR G.T. NANDURA

१९६६ मधील तरतुदीनुसार आणि त्या अनुषंगाने वेळोवेळी तयार करण्यात आलेल्या प्रचलित नियमानुसार दिनांक 2.11.2006 पासून अकृषिक आकारणीचे जे सुधारित प्रमाणदर अंमलात येतील त्या दरानुसार आकारणीची रक्कम भरणे परवानगीधारकावर बंधनकारक राहील. तसेच दिनांक 2.11.2006 पासून निर्गमित केलेल्या आदेशान्वये जरी जुन्या दराने अकृषिक आकारणीचे दर नमूद केले असले तरी जुने दर व नविन अस्तित्वात येणारे दर यामधील फरकाची रक्कम भरणे परवानगीधारकावर बंधनकारक राहील. त्यायप्रमाणे रुपांतरीत कराची रक्कम भरणे हे देखिल अनुज्ञाग्राही यांचेवर बंधनकारक राहील. सुधारीत प्रमाणदर प्रति चौ.मी. 0.05 पैसे दिनांक 2.11.2006 (अक्षरी पन्नास पैसे)

१३) सदर जागेची अंतिमतडीची मोजणी फि रक्कम रुपये) चलन क्रमांक 916 दिनांक

रुपये
/ / अन्वये
शासनास जमा केली पाहिजे.

१४) भूमापन विभागाकडून जमिनीची मोजणी करण्यात आल्यानंतर अशा जमिनीचे जितके क्षेत्रफळ आढळून येईल, तितक्या क्षेत्रफळानुसार या आदेशात आणि सनदीमध्ये नमूद केलेले क्षेत्र तसेच बिगरशेती आकारणी यात बदल करण्यात येईल.

१५) सदर जमिनीच्या बिगरशेतकी वापरास प्रारंभ केल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीत अनुज्ञाग्राहीने अशा जमिनीवर आवश्यक ती इमारत बांधली पाहिजे. अन्यथा सदरहू आदेश रद्द समजणेत येईल व अनुज्ञाग्राही यांना अकृषिक परवानगीसाठी नव्याने अर्ज सादर करावा लागेल.

१६) पूर्वीच मंजूर केलेल्या नकाशावर हुकूम अगोदरच बांधलेल्या इमारतीत अनुज्ञाग्राहीने कोणतीही भर घालता कामा नये किंवा ती मध्ये कोणताही फेरबदल करता कामा नये. मात्र अशी भर घालण्यासाठी किंवा फेरबदल करण्यासाठी सक्षम प्राधिका-याची परवानगी घेऊन आणि अशा भरीचे किंवा फेरबदलाचे नकाशे मंजूर करून घेऊन तशी कार्यवाही करता येईल.

१७)अनुज्ञाग्राही व्यक्तीने आजूबाजूच्या परिसरात अस्वच्छता व घाण निर्माण होणार नाही अशा रितीने आपल्या स्वतःच्या खर्चाने आपली पाणी पुरवठ्याची व सांडपाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

१८) जमिनीच्या बिगरशेतकी वापरास प्रारंभ केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीत अनुज्ञाग्राही व्यक्तीने महाराष्ट्र जमिन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व बिगरशेतकी आकारणी) नियम १९६१ यातील अनुसूची पाच मध्ये दिलेल्या नमुन्यात सनद दिली पाहिजे आणि आदेशातील सर्व शर्तीचा समावेश सनदेत करण्यात येईल व अशा सर्व शर्ती अर्जदारावर बंधनकारक असतील.

१९अ) या आदेशात आणि सनदीमध्ये नमूद केलेल्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचा अनुज्ञाग्राही व्यक्तीने उल्लंघन केल्यास उक्त अधिनियमांच्या उपबंधान्वये अशा अनुज्ञाग्राहीवर ज्या कोणत्याही शास्तीस पात्र ठरेल त्या शास्तीस व्यतिरिक्त त्याने [illegible] ती निर्दिष्ट करेल असा दंड आणि आकारणी भरल्यानंतर उक्त जमिन विकण्यास अर्जदारांच्या ताब्यात राहू देण्याचा अधिकार असेल.

ब) वरिल खंड अ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही या परवानगीच्या तरतुदीचा भंग करून कोणतीही इमारत किंवा बांधकाम उभे करण्यात आले असेल किंवा अशा तरतुदीच्या विरुध्द या इमारतीच्या किंवा बांधकामाचा वापर करण्यात आला असेल तर निर्दिष्ट

THE SEAL THE SUB REGISTRAR NANDURA

वाचर
22 JUN 2010
२००९